बुधवार, दि २ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३ रा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# 'आयत्या बिळावर नागोबा', विधानसभेत बोलण्यासाठीच पाठवले जाते

## आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर माजी राज्यमंत्री खोतकर यांची टिका

## केंद्रात आणि राज्यात आमच्या विचारांचे सरकार; तुमचं सरकार आल्यावर आणा योजना आणि नंतर सांगा

**जालना । प्रतिनिधी -** केंद्रात आणि राज्यात आमच्या विचारांचं सरकार आहे. केंद्र सरकारच्या ड्रिम प्रोजेक्टमध्ये वैद्यकिय महाविद्यालयाचा समावेश असून देशभरात १२४ महाविद्यालये उभारण्याचा केंद्राचा मानस आहे, त्यात महाराष्ट्र राज्यात १४ वैद्यकिय महाविद्यालये सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय केंद्राने आठ वर्षापुर्वीच घेतला होता. मुंबई-नाशिक येथील वैद्यकिय महाविद्यालयानंतर आता राज्यातील नऊ वैद्यकिय महाविद्यालयांचा प्रश्न निकाला निघाला आहे. यात जालना वैद्यकिय महाविद्यालयाचा समावेश आहे. येथील लोकप्रतिनिधी केवळ बाईट देऊन, कटाआऊट लावून फुकटचे श्रेय घेत आहेत. ते आयत्या बिळावरील नागोबा असल्याची टिका माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी येथे केली आहे.

जालना वैद्यकिय महाविद्यालयाला १०० विद्यार्थी क्षमतेसह सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाकडून परवानगी देण्यात आली. याबाबतीत माहिती देण्यासाठी मंगळवार (दि १) रोजी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेत माजी राज्यमंत्री खोतकर हे बोलत होते. यावेळी भाजपाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) अरविंद चव्हाण, अशोक पांगारकर, राजेश राऊत, पंडीत भुतेकर, भाऊसाहेब घुगे, विष्णु पाचफुले, शाह आलमखान आदींची उपस्थिती होती.

खोतकर म्हणाले की, जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात देशातील डॉक्टरांची संख्या कमी आहे. ती वाढविणे गरजेचे असल्याने तसेच ग्रामीण व आदीवासी भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने देशात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. त्यात १४ महाविद्यालये ही महाराष्ट्र राज्यात सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय आठ वर्षांपुर्वीच घेण्यात आला होता. केंद्राच्या निर्णयामुळे देशातील महाविद्यालयांची संख्या वाढणार आहे. यापुर्वी मुंबई व नाशिक येथील महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली होती. आता जालनासह इतर जिल्ह्यातील वैद्यकिय महाविद्यालयांना केंद्राने मंजुरी दिली आहे. नविन महाविद्यालयांमुळे एमबीबीएस विद्याथी प्रवेश



क्षमतेत आठशे ने वाढ होत आहे.

राज्यातील महायुतीच्या सरकारमधील वैद्यकिय मंत्री असलेले गिरीश महाजन व नंतर हसन मुश्रीफ यांनी सातत्याने राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयांच्या मंजुरीसाठी केंद्राकडे पाठपुरावा केला आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनीही केंद्रात जे.पी. नड्डा यांच्याशी चर्चा करुन जालनासह राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयांचा प्रश्न मार्गी लावला आहे. केंद्र आणि राज्यात आमच्या विचारांचे सरकार आहे. त्यामुळे केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मी (अर्जुनराव खोतकर), अरविंद चव्हाण यांच्या **पान २ वर**

### आम्ही फोटो सेशन केले नाही...

वैद्यकिय महाविद्यालयाच्या जागे संदर्भात शहरापासून जवळील विविध जागा आम्ही जिल्हाधिकारी यांना सुचविल्या, वैद्यकिय मंत्र्यांना देखील येथील जागेबाबत बोललो आहे. रेवगाव येथील २०० एकर असलेली जागा दाखविली. येथील ग्रामपंचायतकडुन जागा मिळवून देण्यात येणार असल्याचेही सांगितले. याव्यतिरिक्त विविध जागाबाबत जिल्हाधिकारी व संबंधीत अधिकाऱ्यांशी भेटलो, बोललो. आम्ही फोटो सेशन केले नाही एवढेच. जागेवर जाऊन फोटो काढायची त्यांना सवय झालेली आहे. असे फोटो काढून कट आऊट लावून जाहिरातबाजी करुन श्रेय भेटत नसते असा टोलही श्री खोतकर यांनी आ. गोरंट्याल यांना लगावला.

### बेगाने शादी मे अब्दुला दिवाना - अरविंद चव्हाण

केवळ सध्या आमदार असल्यामुळे आयते श्रेय घेत आहेत, पुढे निवडणुका आलेल्या आहेत त्यामुळे हे सर्व सुरु आहे. माजी राज्यमंत्री खोतकर यांनी सविस्तर बाजु मांडल्यामुळे जास्त काही बोलण्यासारखे नाही मात्र, एवढं सांगतो की, बेगाने शादी मे अब्दुला दिवाना अशी आमदारांची अवस्था झाली असल्याची टिका राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) अरविंद चव्हाण यांनी केली. ड्रायपोर्ट, सिडको, वंदे भारत ट्रेन, रेल्वे स्टेशनचे नुतनीकरण से एकना दोन हजारो कामे जालन्यात झालीत काही सुरु आहेत. फुकटचे श्रेय घेण्याचा हा प्रयत्न आहे, मात्र जनता सुज्ञ आहे त्यामुळे यांचे निवडणुकीसाठीचे चाललेले हे प्रयत्न जनता हानून पाडेल असेही श्री चव्हाण म्हणाले.

### खा. काळे यांचे वक्तव्य लांच्छनास्पद; वैद्यकिय महाविद्यालयात कुणी राजकारण करू नये; ज्याचे श्रेय त्याला देण्यास हरकत काय - भास्कर दानवे

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात अपेक्षीत यश मिळाले नाही. रावसाहेब दानवे यांचाही पराभव झाला. जनादेश रावसाहेब दानवे यांनी स्विकारला. पराभव झाला असला तरी जालना जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिने ज्या कामांची सुरुवात त्यांच्या कार्यकाळात झालेली होती. जे प्रकल्प हाती घेण्यात आलेले होते. ती कामे आज पूर्णत्वाकडे जात आहेत. त्यासाठी रावसाहेब दानवे हे आजही सरकार दरबारी जातात. कामे कशी पुर्ण होतील याचा प्रयत्न करताहेत अशी माहिती भास्कर दानवे यांनी यावेळी दिली. वैद्यकिय महाविद्यालासाठी रावसाहेब दानवे यांनी जे.पी नड्डा राज्याच्या दौऱ्यावर असतांना भेट घेतली होती. त्यावर नड्डा यांनी रावसाहेब दानवेंना दिल्लीत बोलवले. त्यांनी नंतर दिल्लीला जावून जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. नड्डा यांनी आरोग्य खात्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जालन्याच्या मेडिकल कॉलेजसह राज्यातील भंडारा, वाशीम, हिंगोली, अमरावती, गडचिरोली बुलढाणा, अमरनाथ येथील कॉलेजला मान्यता देऊन प्रत्येकी १०० प्रवेश क्षमतेस मंजुरी दिली. या शिवाय नाशिक व जीटी हॉस्पीटलसाठी प्रत्येकी ५० प्रवेश क्षमतेस मंजुरी मिळाली आहे. अशा प्रकारे ९०० जागांना रावसाहेब दानवे यांच्यामुळे मंजुरी मिळाली आहे. जालना वैद्यकिय महाविद्यालयासह इतर ९ जिल्ह्यातील महाविद्यालयांचा प्रश्न चुटकीसरशी सोडविला गेला आहे. त्यामुळे यात कुणीही राजकारण करु नये, ज्याचे श्रेय त्याला देण्यास हरकत काय असा प्रश्नही यावेळी भास्कर दानवे यांनी उपस्थित केला.

**खा. काळे यांचे वक्तव्य लांच्छनास्पद**

वैद्यकीय महाविद्यालयासाठी केंद्र सरकारच अडथळे निर्माण करत असल्याचे वक्तव्य खा. डॉ. कल्याण काळे यांनी केले होते. त्यावर असे लांच्छनास्पद वक्तव्य खा. काळे करतात, त्यांना चॅलेंज आहे की, कोणता अडथळा केंद्र सरकारने आणला हे दाखवून द्यावे. एखादा पुरावा द्यावा, जालना जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिने काळे यांचे वागणे हे न शोभणारे आहे, पराभूत झाल्यानंतरही रावसाहेब दानवे हे अधिकारी- मंत्र्यांना भेटून काम करताहेत. जालन्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु होत आहे. याचे काळे यांनी स्वागत करायला हवे. परंतु तसे न करता ते टिका टिप्पणी करताहेत हे लांच्छनास्पद असल्याचेही भास्कर दानवे म्हणाले.

# वैदयकिय महाविद्यालयाचा मार्ग मोकळा; शंभर विद्यार्थ्यांच्या प्रवेशास केंद्राची मंजुरी - आ. गोरंट्याल



**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या इतिहासात सुवर्णक्षरांनी लिहल्या जावा असा दिवस असून वैद्यकिय महाविद्यालयाचा मार्ग मोकळा झाला असून शंभर विद्यार्थी प्रवेश क्षमतेस केंद्राने मंजुरी दिली आहे. आपण केलेले प्रयत्न यशस्वी झाले असल्याचा दावा आ. कैलास गोरंट्याल यांनी शहरातील एका हॉटेलमध्ये मंगळवार (दि १) घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.

या पत्रकार परिषदेस युवा नेते अक्षय गोरंटयाल, विजय चौधरी, राम सावंत, महावीर ढक्का, जगदीश भरतीया, दीपक भुरेवाल, वाजेद पठाण, विनोद रत्नपारखे, हरीश देवावाले, रमेश गौरक्षक,अतीक खान, शुभम राऊत, शेख इब्राहिम, विष्णू वाघमारे संजय भगत आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आ. कैलास गोरंटयाल म्हणाले की, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार असतांना जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर व्हावे यासाठी आपण आग्रही मागणी केली होती. त्यावेळी तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री आ.अमित देशमुख यांनी तज्ञ अधिकाऱ्यांचे एक पथक जालना येथे पाठवून इंदेवाडी **पान २ वर**

# अधिष्ठाता डॉ.सुधीर चौधरी यांचा माजी राज्यमंत्री खोतकर यांच्याकडून सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** येथील नव्याने सुरू झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सन.२०२४=२५ या चालु शैक्षणिक वर्षापासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे त्यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर सुधीर चौधरी यांनी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांची दर्शना बंगला भाग्यनगर येथील भेट घेतली व वैद्यकीय महाविद्यालय व प्रवेश प्रक्रिया संदर्भात सविस्तर चर्चा केली महाविद्यालय महाविद्यालयातील बांधकाम व इतर बाबीवर . बैठकीमध्ये चर्चा झाली.यावेळी खोतकर यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी एकबाल पाशा, शाह आलम खान पठाण, मेघराज चौधरी, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, भगवान अंभोरे, सरपंच राहुल गवारे, दीपक वैद्य, शुभम टेकाळे, यासह शिवसेना युवासेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## भारत मातेचे थोर सुपुत्र

भारत मातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतः चा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### 'जय महाराष्ट्र' कार्यक्रम नवीन दिमाखदार रुपात पुन्हा सुरु; २ ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाच्या पहिल्या भागात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची मुलाखत

**मुंबई -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम नवीन दिमाखदार स्वरूपात दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरुन जनतेच्या भेटीला येत आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या नवीन स्वरूपातील पहिल्या भागात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाने मागील अनेक वर्षांपासून जनतेच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले असून या कार्यक्रमाला जनतेचा उदंड प्रतिसाद लाभला आहे.

# सर्वपित्री अमावस्येचे महत्त्व

प्रतिवर्षी श्राद्धविधी करणे हा हिंदु धर्मातील एक महत्त्वाचा आचारधर्म असून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पुराणकाळापासून चालत आलेल्या या विधीचे महत्त्व आपल्या ऋषीमुनींनी अनेक धर्मग्रंथांतून लिहून ठेवले आहे.या लेखात सर्वपित्री अमावस्येचे महत्त्व आपण जाणून घेऊया.

पितृपक्षातील अमावस्येला हे 'सर्वपित्री अमावस्या' हे नाव आहे. या तिथीवर कुळातील सर्व पितरांसाठी उद्देशून हे श्राद्ध केले जाते. वर्षभरात किंवा पितृपक्षातील अन्य तिथींवर श्राद्ध करणे संभव न झाल्यास, या तिथीवर सर्वांसाठी हे श्राद्ध करणे अत्यंत आवश्यक आहे; कारण पितृपक्षातील ही अंतिम तिथी आहे. शास्त्रात सांगितले आहे की, श्राद्धासाठी अमावस्येची तिथी अधिक योग्य तिथी आहे आणि पितृपक्षातील अमावास्या ही सर्वाधिक योग्य तिथी आहे.

शास्त्रात ज्या कृतींसाठी जो काळ नेमून दिलेला आहे, त्या त्या काळात त्या कृती करणे आवश्यक आणि महत्त्वाचे ठरते. त्यामुळे पितृपक्षातच महालय श्राद्ध करावे. पितृपक्षात महालय श्राद्ध करण्याविषयी निरनिराळे पक्ष सांगितले आहेत. सांप्रत मृत व्यक्तीच्या (मृत्यू झालेल्या) तिथीलाच पितृपक्षात एक दिवस महालय श्राद्ध केले जाते. जननाशौच किंवा मरणाशौच (सुवेर-सुतक) किंवा अन्य काही अपरिहार्य कारणामुळे एखाद्याला त्या तिथीला महालय श्राद्ध करणे शक्य न झाल्यास सर्वपित्री अमावास्येला करावे. अन्यथा सोयीनुसार कृष्ण पक्षातील अष्टमी, द्वादशी, अमावास्या आणि व्यतीपात योग या दिवशीही महालय श्राद्ध करता येते.

पितृपक्षात जर सुतक पडले तर, मृत व्यक्तीची तिथी जर सुतक संपल्यावर येत असेल तर तेव्हा पितृपक्षातील विधी करू शकतो, जर मृत व्यक्तीची तिथी सुतक असलेल्या दिवसात असल्याने सर्वपित्री अमावास्याला विधी करु शकतो. यात फक्त मृत व्यक्ती जर आपले आई-वडिल यांपैकी कोणी असल्यास त्यांचे श्राद्ध याच वर्षी करू शकत नाही. पुढील वर्षी करु शकतो. कलियुगात कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकालाच आध्यात्मिक त्रास असल्याने, श्राद्ध करण्याच्या जोडीला 'श्री गुरुदेव दत्त' हा नामजपही अधिकाधिक करावा.दत्त ही देवता पितरांचा स्वामी असल्याने त्याचे नामजपाने पितरांना सद्गती मिळण्यास मदत होते त्याचा लाभ आपल्यालाही होतो.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'श्राद्ध'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

पान १ व ४ वरुन

## आयत्या बिळावर ...

प्रयत्नांमुळे हे सर्व शक्य झाले आहे. आमदार केवळ श्रेय घेण्यात पटाईत असल्याचा आरोपही यावेळी खोतकर यांनी केला. जालना शहर महानगर पालिकेसाठी सोलर पॅनलचा प्रस्ताव आम्ही पाठवला आहे. तर या महाशयांनी सोलार साठी १०० कोटी मंजुर झाल्याच्या बातम्या छापून आणल्या. १५ कोटी नाट्यगृहासाठी मंजुर झाल्याचे आमदार सांगताहेत तर ते पैसे कुठयं, पत्रकारांनीही शहानिशा करुन वृत्त छापवीत अशा कानपिचक्याही श्री खोतकर यांनी घेतल्या. आमदार पत्रकार परिषद घेतात, प्रेस नोट काढतात त्यामुळे आपल्याला छापावे लागत असेल, आपल्या छापण्याबद्दल कोणतेही दुमत नसल्याचेही खोतकर म्हणाले. विधानसभेत बोलण्यासाठीच पाठवलं जाते. हे फुकटचे श्रेय घेणारे आयत्या बिळावर नागोबा आहेत. निर्णय हे सरकार घेत असते, त्यामुळे तुमचे सरकार आले की, तुम्ही आना प्रकल्प नंतर सांगा असा सल्लाही यावेळी खोतकर यांनी आ. गोरंट्याल यांना दिला.

## वैद्यकिय महाविद्यालयाचा ...

जागेची पाहणी केली होती. त्यानंतर स्वतः देशमुख यांनी देखील जालना येथे येवून अधिकाऱ्यांनी निश्चित केलेल्या जागेची पाहणी करून पुढील प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले होते. दरम्यानच्या काळात महाविकास आघाडीचे सरकार पायउतार होऊन नवीन सरकार सत्तेत आले. मुंबईत आयोजित अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील काही जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, त्यात जालन्याचा समावेश नसल्याने आपण या निषेधार्थ विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बसून उपोषण करत राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्यावेळी आ.राजेश टोपे, आ. राजेश राठोड, आ. सतीश चव्हाण यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी आपल्याला पाठिंबा दिला होता. आपण उपोषण करत असतांनाच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधिमंडळाच्या सभागृहात जात असतांना त्यांनी आपल्या पाठीवर थाप देत उपोषण मागे घेण्याचे सांगत सभागृहात तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांना बोलवून जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. त्यानंतर आर्थिक तरतूद करण्यासह सदर महाविद्यालय मंजुरीचा प्रश्न मार्गी लागल्याचे आ.गोरंट्याल यांनी सांगितले. महत्वाची बाब म्हणजे या मंजुरीनंतर मेडिकल कॉलेजसाठी जागेचा तिढा निर्माण झाला. इंदेवाडी येथे पूर्वी पाहणी करण्यात आलेली जागा मनोरुग्णालयासाठी मंजूर करण्यात आली. त्यामुळे नंतर पुन्हा जागेचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ड्रायपोर्ट जवळ, खादगाव, निधोना, शहरातील कन्हैय्यानगर येथील उपलब्ध जागांची पाहणी करून शेवटी कन्हैय्यानगर येथील शासकीय जागा मेडिकल कॉलेजसाठी निश्चित करण्यात आली मात्र, तेथेही पुन्हा अडथळे आल्याने अखेरीस जालना - अंबड रोडवरील काजळा पाटी जवळ गणेश नगर येथील शासकीय जमिनीची पाहणी करून सदर जागा निश्चित करण्यात आली. राज्याचे विद्यमान वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील आपल्याला सातत्याने सकारात्मक प्रतिसाद देत जागेचा आणि मेडीकल कॉलेज मंजुरीसाठी निर्माण झालेले अडथळे दूर करण्यासाठी मौलाची मदत केली असून स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या अन्य सहकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यासाठी मोठे सहकार्य केल्याचे आ.कैलास गोरंट्याल यांनी सांगितले. दिल्ली येथून आलेल्या वरिष्ठ अधिकारी आणि डॉक्टरांच्या पथकाने गणेश नगर येथील जागेची तसेच मेडिकल कॉलेज सुरू करण्यास मंजुरी मिळाली तर त्यासाठी बगडीया हॉटेल आणि ग्लोबल गुरुकुल येथील जागेची पाहणी करून त्याबाबतचा अहवाल संबंधितांकडे सादर केल्याचे सांगून आ.कैलास गोरंट्याल म्हणाले ग्लोबल गुरुकुलची जागा मेडिकल कॉलेजसाठी निश्चित करण्यात आली. मात्र, काही त्रुटी असल्याने पुन्हा एकदा अडचणी निर्माण झाल्या होत्या. केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांच्या कोर्टात चेंडू गेल्यानंतर प्राध्यापक व तांत्रिक पदांची भरती करण्यासाठी त्यांच्याकडे दोन महिन्यांची मुदतवाढ मागण्यात आली आणि या मुद्दतीत राज्य सरकारच्या मदतीने सदर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर जालन्यातील मेडिकल कॉलेज सुरु करण्यासाठी शासनाची मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाने केवळ मंजुरी दिली नाही तर कॉलेज इमारतीचे भाडे आणि लाईट बिल, मनपा कर यासाठी लागणारा खर्च देखील उचलला असल्याचे स्पष्ट करत तिसऱ्या राऊंड मध्ये जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होईल असा विश्वास आ. कैलास गोरंट्याल यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी दत्ता पाटील घुले,शिवप्रकाश चितळकर, संतोष माधोवाले, शेख करीम लीडर, गणेश चौधरी, चंद्रशेखर कोताकोंडा, चंद्रकांत रत्नपारखे, छोटू चित्राल आदींची उपस्थिती होती.

**खोतकरांवर टिका**

घराजवळील नाला होत नाही त्याच्याकडुन काय वैद्यकीय महाविद्यालय मंजुर होईल अशी टिका आ. गोरंट्याल यांनी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्यावर केली. दहा वर्षे ते मंत्री होते त्यांनी काय कामे केली ते सांगावे असे चॅलेंजही त्यांनी यावेळी खोतकरांना दिले.

## महिला सक्षमीकरणासाठी ...

झालेले आहेत अग्रवाल यांचा व शिवसेनेचा चाहता वर्ग परतुर विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात दिसत आहे केलेल्या विकास कामाची पावती यांना आगामी काळामध्ये शिवसेनेच्या माध्यमातून जरूर भेटेल अशी या ठिकाणी ग्वाही दिली.यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल,शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे व ओबीसी जिल्हाध्यक्ष शिवाजी तरवटे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या मेळाव्यास परतूर विधानसभा क्षेत्रातल्या कानाकोपऱ्यातून महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती या महिला मेळाव्याचे प्रास्ताविक महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख नीताताई घोंगडे यांनी केले तर सूत्रसंचालन शिवसेना शहरप्रमुख दीपक हिवाळे यांनी केले सदर महिला मेळावा यशस्वी करण्यासाठी परतूर मंठा शिवसेना जेष्ठ नेते तथा मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे,उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले,परतुर तालुका प्रमुख अमोल सुरूंग, मंठा तालुका प्रमुख उदय बोराडे, ओबीसी व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष शिवाजी तरवटे,संघटक विजयकुमार गिरी, शहर प्रमुख दिपक हिवाळे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे,ललिताबाई काळदाते, महिला आघाडी तालुकाप्रमुख नीताताई घोंगडे, सुनिता देशमुख उप तालुका प्रमुख नितीन राठोड,उपतालुकाप्रमुख रंजीत कोल्हे, युवासेना तालुकाप्रमुख अविनाश कापसे, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष खाजाभाई. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तालुका अध्यक्ष कैलास चव्हाण, युवा सेना उपजिल्हाध्यक्ष योगेश गणगे, व्यंकटेश लिपणे, प्रणय मोर, रामप्रसाद कसाब, राहुल भदर्गे, अतुल आर्दड, नागेश चिखले. दिनकर शेंडगे, गोविंद खरात, दीपक गायकवाड, विजू चव्हाण, सोनाली राऊत, गणेश आढे, कैलास पुरी, प्रल्हाद शेळके, सविताताई ताठे, शरद तळेकर यांनी परिश्रम घेतले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# बौध्द समाजाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन

## उपोषणकर्ते विकास लहाने यांच्या मागण्याची दखल घेण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** बौध्द समाजाच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले विकास लहाने यांच्या उपोषणाची शासनाने दखल घेतली नसल्याने मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता तिव्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करीत रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. यावेळी समाजातील सर्वच पक्षाचे, संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरीकांची उपस्थिती होती.

विकास लहाने यांच्या आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने आज आंबेडकरी समाज आक्रमक झाल्याचे पहायला मिळालं.

भिमा कोरेगाव प्रकरणातील व इतर न्याय हक्कासाठी केलेल्या आंदोलनाचे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत या इतर प्रमुख मागण्यांसाठी बौध्द समाजातील आंदोलन विकास लहाने यांनी १९ सप्टेंबर २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केलंय. परंतु त्यांच्या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने आज बौध्द समाज रस्त्यावर उतरुन आंदोलन करतांना पहाला मिळाला. सरकार बौध्द समाजाच्या मागण्याकडे दुलक्ष करीत असल्याच्या आरोप आंदोलकांनी केला. बौध्द समाजातील व्यक्ती उपोषण करीत असल्यानेच त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात येतं असून इतर आंदोलनाची मात्र सरकार दखल घेत असल्याचंही आंदोलकांनी म्हटलंय. जोपर्यंत जिल्हाधिकारी निवेदन घेण्यासाठी येणार नाहीत, तोपर्यंत रास्ता रोको आंदोलन सुरूच राहणार असल्याचे आंदोलकांनी म्हटलं. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या वतीने मध्यस्ती करण्यात आली. अखेल उप जिल्हाधिकारी मनिषा दांडगे यांनी आंदोलनकर्त्याचे उपोषणस्थळी येत निवेदन स्वीकारले. यावेळी तहसिलदार छाया पवार यांची देखील उपस्थिती होती. बौध्द समाजाच्या प्रलंबीत प्रलंबीत मागण्या सोडविण्यासाठी एक समिती गठीत करावी अशी मागणी आंदोलक विकास लहाने यांनी केली. एस.सी.एस. टी मधील वर्गीकरण व क्रिमीलरची अट रद्द करावी, शेतकर्यांना सरसगट कर्ज माफी देण्यात यावी. गायरान धारक शेतकर्यांना सातबारे देण्यात यावे, रमाई घरकुल व पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलांना ५ लाख रुपये अनुदान देण्यात यावे. बौध्द तरुणांना ५० लाखपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे. मोतीबाग तलावात भगवान बुद्धाची मुर्ती बसवण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाला तथागत भगवान बुध्दाचे नाव देण्यात यावे, दादर रेल्वे स्टेशनचे नामकरण चैत्यभूमी करण्यात यावे. यासह विविध मागण्या आंदोलकांनी केल्या. यावेळी विविध पक्ष, संघटनेच्या पदाधिकार्यासह बौध्द समाजातील आंदोलक उपस्थित होते.

# सिद्धार्थ महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उदघाटन

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ महाविद्यालयात दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तथागत गौतम बुद्धाच्या तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर




बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा उद्घाटक मा.प्राचार्य रमेश देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या भितीपत्रिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. रमेश देशमुख, उपप्राचार्य डॉ. सुनील मेढे, नॅक समन्वयक डॉ. नितीन कस्तुरे , विज्ञान मंडळाचे समन्वयक तथा प्रमुख व्यक्ते प्रा.मनीष बनकर,डॉ. शरद मोहरीर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी नॅक समन्वयक प्रा डॉ.नितीन कस्तुरे यांनी विज्ञान मंडळाची भूमिका व शैक्षणिक वर्ष २०२४ २५ मध्ये घेतल्या जाणाऱ्या उपक्रमा संदर्भात माहिती दिली.प्रमुख वक्ते प्रा. मनीष बनकर यांनी आजचा विद्यार्थी हा चिकित्सक व तर्कज्ञानी असतो. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन व सारासार विचार करण्याची पद्धती अवलंबणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती वाढवावी आणि विज्ञानातील संशोधक निर्माण व्हावेत, यासाठी विज्ञानाच्या विविध स्पर्धेत सहभाग घेणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक तथा अध्यक्ष प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी मानवी जीवनात विज्ञानाचे महत्त्व व दुष्परिणाम याविषयी माहिती दिली व अध्यात्म आणि विज्ञान याची विद्यार्थ्यांनी सांगड घालून आपले जीवन यशस्वी करावे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कु. संजिवनी उबाळे या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा.डॉ. प्रदीप मिसाळ यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा. बी. ए. येवले, प्रा. डॉ. पी.व्हीं .राजपूत, प्रा. डॉ. डी. टी.तांगडे, प्रा.डॉ. आर. डी. मोरे,प्रा. डॉ. एन. पी. भोसले, प्रा.डॉ. एस.एम. जाधव,श्री सुनिल छडीदार, श्री. अंकुश राठोड यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास विद्यार्थी ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लुंबिनी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे तालुका क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश







**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथून जवळच असलेल्या कुंभारझरी येथील लुंबिनी विद्यालय कुंभारझरीचे तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. या विद्यालयाची विद्यार्थीनी कुणाल दमुता तायडे वर्ग ८ वा याने थाळीफेक प्रथम, गोळा फ `क प्रथम, लांब उडी द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तर रेणुका सतीश कांबळे वर्ग ८ वा गोळा फेक द्वितीय, वैष्णवी आत्माराम म्हस्के वर्ग ८ वा लांब उडी प्रथम, लक्ष्मी गणेश शिंदे वर्ग १० वा भालाफेक प्रथम, दिपाली राजू जाधव वर्ग १० वा भालाफेक द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

सर्व विजयी विद्यार्थ्यांचे सम्राट अशोक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदामराव सदाशिवे, सचिव दिपक सदाशिवे, मुख्याध्यापक डि एस कासार, यांच्यासह शिक्षक व्हि डी चितेकर, आर जी जितकर, बि आर दंदाले, जी ई मुंढे, आर टी भोपळे, एन पी भालेराव, पी आर चव्हाण, पी बी बंगाळे व गावकरी मंडळी यांनी अभिनंदन केले. तसेच मार्गदर्शक शिक्षक जी ई घुगे यांचेही सर्वांनी अभिनंदन केले आहे.

## उगले यांचा गौरव सोहळा, विद्यार्थ्यांना बॅगचे वाटप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथून जवळच असलेल्या जाफराबाद तालुक्यातील डहाकेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक काशीनाथ उगले सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने ग्रामस्थांतर्फे त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा सोमवारी शाळेत आयोजित केला होता. यावेळी शिक्षक व ग्रामस्थांच्या वतीने उगले यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार केला.

यावेळी मुख्याध्यापक उगले यांनी ३३ वर्षांच्या सेवाकाळात विद्यार्थी, सहकारी शिक्षक व पालकांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थी दैवत मानून कार्य करीत गेल्यास तुम्हाला जीवनात कुठेच अडचण येत नाही. असेही ते म्हणाले.

यावेळी आठवण म्हणून मुख्याध्यापक उगले यांनी पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप केले. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष गणेश डहाके, उपाध्यक्ष लक्ष्मण जंजाळ, माजी सरपंच मनोज शिंदे, प्रताप जाधव, बळीराम शिंदे, संदीप कदम, दामोदर डोईफोडे, रामकृष्ण गिते, विष्णू बुधवत, अतुल देवकर आदींची उपस्थिती होती.

# मंजूर पिक विम्याच्या रकमेची सरकारकडून तरतूद; शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविमा लवकरच जमा होणार

## आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्याला यश

**कर्जत । प्रतिनिधी -** कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश असून २०२३-२४ खरीप हंगामातील पीक विम्याच्या मंजूर रकमेची राज्य सरकारकडून तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच पीक विम्याची रक्कम जमा होणार आहे.

खरीप हंगाम २०२३-२४ साठी शासनाने नियुक्त केलेल्या ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीमार्फत शेतकऱ्यांना पीक विमा दिला जातो. या कंपनीच्या कार्यक्षेत्रात अहिल्यानगर, नाशिक, सातारा, सोलापूर, जळगाव आणि चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. या जिल्ह्यांसाठी पीक विम्याची एकूण ७,६२१ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली होती, यापैकी ५,४५९ कोटी रुपये पीकविमा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या खात्यात आधीच जमा झाले होते. परंतु विमा कंपनीच्या नियमांच्या पुढील रक्कम राज्य सरकारने देणं भाग होते. मात्र सरकारने त्याची अजूनपर्यंत तरतूद केली नव्हती, त्यासाठी आमदार रोहित पवार यांनी वारंवार पाठपुरावा केला . याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन महाराष्ट्र शासनाकडून विमा कंपन्यांना पीक विम्याची मंजूर रक्कम देण्यात यावी आणि नुकसान भरपाईचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ जमा करावे अशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून पीक विम्याची मंजूर रक्कम पीक विमा कंपनीला वितरीत करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात असून पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने जमा करण्याचे आदेश शासनाकडून पीक विमा कंपनीला देण्यात आले आहेत.

आमदार रोहित पवार यांनी प्रशासनाच्या सहकार्याने, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्वतःची यंत्रणा राबवून गेल्या वर्षी शेतकऱ्यांकडून पीक विम्याचे फॉर्म भरून घेतले होते. त्यामुळे जिल्ह्यात पीक विमा भरण्यात कर्जत-जामखेड मतदारसंघाचा अव्वल क्रमांक होता. केवळ फॉर्म भरण्यापुरतेच आमदार रोहित पवार यांनी प्रयत्न केले नाही तर पीक विमा हा नियमात बसताच तो शेतकऱ्यांना मिळावा यासाठी अधिकारी, मंत्री आणि विमा कंपन्यांकडे पाठपुरावाही केला होता. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशनात आणि हिवाळी अधिवेशनातही त्यांनी या विषयांवर आवाज उठवला होता. यापूर्वीही आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्यामुळे कर्जत आणि जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना पिकविम्याचे १४३ कोटी ५५ लाख रुपये मिळाले होते. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच शासनाने ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीला पीक विम्याची मंजूर रक्कम वितरित करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. नुकसानभरपाई मिळणार असल्याने बळीराजा सुखावला असून, लवकरच ही रक्कम त्यांच्या खात्यात जमा होईल, अशी अपेक्षा आहे.

कर्जत-जामखेड मतदारसंघाचा कुटुंबप्रमुख म्हणून मी नेहमीच मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी काम करत आलो आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रत्येक विषयाचा कसोशिने पाठपुरावा केला आणि त्याला त्या-त्या वेळी यशही आले. भविष्यातही सर्वांच्या सहकार्याने शेतकऱ्यांसाठी आणि एकूणच मतदारसंघासाठी असंच काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. मंजूर झालेला पीक विमा पुढील काही दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. याबाबत काही अडचण आल्यास कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी अथवा माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे.

# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत ईबीके उर्दु शाळेच्या शिक्षकांनी पटकावले पारितोषिक

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनातर्फे शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध वर्गांचे आणि विविध विषयांचे गट सहभागी झाले होते.

शिक्षकांना शिकवण्याचे व्हिडीओ बनवून सरकारला पाठवावे लागले. या स्पर्धेत तालुका स्तरावर, जिल्हास्तरावर



आणि राज्यस्तरावर बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ५,२०,000 शिक्षक सहभागी झाले होते.

जाफराबाद तालुका स्तरावर सेठ ई बी के उर्दु विद्यालयाचे तीन शिक्षकांनी ह्या स्पर्धेत सहभाग घेतला होता आणि तिघांना ही यश आले.

गयास महेमूद शेख यांनी विषय गणितमध्ये - वर्ग १ली २री,च्या गटात प्रथम क्रमांक मिळविले, समीर मुर्तुजा सय्यद यांनी विषय परिसर अभ्यास वर्ग ३री ते ५वी च्या गटात द्वितीय क्रमांक पटकावला, तर साबेरोद्दीन नूरोद्दिन शेख यांनी विषय सामाजिक शास्त्र वर्ग ६वी ते ८वी च्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तालुक्यातील विजयी पाच शिक्षकांपैकी तीन शिक्षक हे ई बी के उर्दू विद्यालयाचे आहे. तिन्ही विजयी शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष देवराव देशमुख, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिव नंदलाल काबरा, कोषाध्यक्ष प्रेमसुख काबरा, संचालक ठमाजी भागवत, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख मुख्याध्यपक एस आर शेख, संचालक मंडळ तसेच शिक्षकांनी अभिनंदन केले.

# राशीन येथे क्रिकेटर रोहित शर्मा यांच्या उपस्थितीत क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

## आमदार रोहित पवार माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन

**कर्जत । प्रतिनिधी -** कर्जत जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांच्या पुढाकाराने नवरात्रीच्या पावन पर्वावर राशीन येथे एक ऐतिहासिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे, ज्यामुळे क्रीडा आणि मनोरंजनाचा जल्लोष होणार आहे. श्री जगदंबा देवी मातेच्या पवित्र भूमीत, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडमी आणि क्रीडा संकुलाच्या भूमिपूजनाचा भव्य कार्यक्रम राशीन येथे गुरुवारी ( दि. ३ ऑक्टोबर २०२४) ला सकाळी ११ वाजता होणार आहे.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचे कर्णधार आणि वर्ल्ड कप विजेता रोहित शर्मा, जो या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहणार आहे. क्रिकेटप्रेमींसाठी हा सोहळा खास आकर्षण ठरणार आहे.

याचबरोबर मनोरंजनाचा तडका म्हणून प्रसिद्ध ऊा घीशींशली, सुप्रसिद्ध गायक रोहित राऊत, आणि श्रावणी महाजन यांचा मधुर आवाज सोहळ्याला रंगत आणणार आहे.

हा सोहळा क्रीडा आणि मनोरंजनाच्या चाहत्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरणार असून या कार्यक्रमाची सध्या जोरदार तयारी सुरू आहे, तरी सर्व भाविक भक्तांनी, क्रिकेट रसिकांनी, मतदारसंघांतील नागरिकांनी या ऐतहासिक सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात येत आहे.

## कर सल्लागार विजय गिनोडिया जेपीसी बँकेच्या सल्लागार समितीवर

**जालना -** येथील कर सल्लागार विजय ब्रिजमोहन गिनोडिया यांची जालना पीपल्स सहकारी बँकेच्या जुना जालना शाखेवर सल्लागार समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जालना पीपल्स बँकेचे चेअरमन संजय मुथा यांनी एक वर्षासाठी ही नियुक्ती केली आहे.

युवा आदर्श

**गांधीजी ...**

**म. गांधीजी जयंती**
**परिधान करे खादी**
**एक दिवसी उत्सव**
**आम्हीचं गांधीवादी**
**गांधी पुतळ्यापाशी**
**सर्व पक्ष्यांची गर्दी**
**हारा फुलांचा खच**
**सगळे देतात वर्दी**
**पिणारं नाही लिकर**
**पाळणारं दारुबंदी**
**तीन तारखेची सोय**
**करून ठेवतो आधी**
**नकोरे मांस मच्छी**
**आम्ही अहिंसावादी**
**दुसरे दिवसासाठी**
**भली लांबडी यादी**
**सर्वत्र ते गांधीगांधी**
**एकदिवसाची नांदी**
**माहीतनाही बापूजी**
**पुन्हा आठवी कधी**
**आचार विचारांमध्ये**
**कुठे नसतात गांधी**
**विसरून जातो कसे**
**गोष्ट ही सरळ साधी**
**कळतीलं खरे गांधी**
**करता आत्मा शुध्दी**
**रे अंत्योदय सूर्योदय**
**जगभरा शांती वृध्दी**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## ‘दिशा’ समितीची आढावा बैठक संपन्न

# लोकहिताची विकास कामे समन्वय ठेऊन तत्परतेने पार पाडा - खासदार डॉ.कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध योजनेंतर्गंत मंजूर असणाऱ्या लोकहितांच्या विकास कामांतील सत्यता तपासून पाहा तसेच ती कामे कोणाच्याही दबावाला बळी न पडता समन्वय ठेवून तत्परतेने पार पाडा, असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले.



जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज आयोजित 'दिशा' समितीच्या आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ.काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार राजेश राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती.

लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ. काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच अनुसूचित जाती व जमाती तसेच अल्पसंख्याक समुदायाच्या नागरिकांना घरकुल मंजुरी करण्याच्या सुचनाही दिल्या.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. तसेच जाफराबाद व भोकरदन तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी विहिरीसाठीचा प्रस्ताव दाखल केला आहे त्यांची पडताळणी शासन नियमांन्वये करून तातडीने विहिरींची मंजूरी करण्यात यावी, अशी सुचनाही खासदार डॉ.काळे यांनी केली.

बैठकीत समितीचे अध्यक्ष डॉ.काळे यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना,राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मध्यान्ह भोजन योजना, संजय गांधी निराधार योजना, डिजीटल भारत, सर्व शिक्षा अभियान, जल जीवन मिशन, उमेद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध लाभाच्या योजना आदी योजनांचाही यावेळी आढावा घेतला. जालना महानगर पालिकेच्या शहरातील टाकाऊ कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्यासाठीच्या कामासह इतर कामांबाबतही दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

केंद्रीय योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी दिशा समिती काम करत असते. यात एकूण २२ विषय समाविष्ट आहेत. केंद्राच्या विविध योजना

तालुकास्तरावर प्रलंबित न ठेवणे तसेच

विकास कामात दिरंगाई झाल्यास तपासणी करणे आदी कामे दिशा समितीकडून करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेतील कामे, लाभार्थ्यांची संख्या जाणून घेत उपस्थित लोकप्रतिनिधी व सदस्यांनी विविध सूचना केल्या. यावेळी बैठकीला संबंधित उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, अभियंता यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या विविध योजना - आशाताई विचारे

## येणाऱ्या निवडणुकांमध्ये महिलांनी शिवसेनेसोबत राहावे- सुभाष साळुंके

**परतुर । प्रतिनिधी -** शिवसेना लाडकी बहीण संपर्क अभियान अंतर्गत आज ता. 0१ रोजी महिलांचा भव्य मेळावा परतुर येथील इंदिरा मंगल कार्यालयात शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्यावतीने आयोजित केला होता या मेळाव्यास

शिवसेना उपनेत्या तथा शिवउद्योग सहकार कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्रमुख व परभणी लोकसभा निरीक्षक सुभाष साळुंखे. हे प्रमुख मार्गदर्शक होते. शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांनी आयोजित केलेल्या महिला मेळाव्या प्रसंगी आशाताई विचारे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांना सक्षम करण्याकरिता महाराष्ट्र राज्यात महिलांसाठी विविध योजना राबवत आहेत महिलांना विविध योजनेद्वारे सक्षम करण्याचे काम शिंदे सरकार करत आहे. महिलांची उपस्थिती पाहता परतुर विधानसभा मध्ये मोहन अग्रवाल यांचे पक्ष बांधणीचे काम उत्कृष्ट असून आपण यांचा सकारात्मक अहवाल शिवसेना नेते यांच्याकडे मंडणार आहोत. सुभाष साळुंखे यांनी मनोगतात सांगितले की, अग्रवाल यांच्या माध्यमातून परतुर विधानसभा क्षेत्रात विविध विकास कामे

पान २ वर

